# प्रशासनात सुधारणा आणि गती देणाऱ्या अधिकारी: मीनल करनवाल

**नांदेड जिल्हा परिषदेच्या सीईओ मीनल करनवाल या संपन्न व्यक्तिमत्त्वाच्या आहेत. त्यांच्या अभिनव कार्यशैलीने त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. तत्पर सेवा देणारे प्रशासन, महिला मुलांप्रतीची सजग जाणीव यातून आकाराला आणलेले कृती कार्यक्रम यामुळे त्या वेगळी वाट चोखाळणाऱ्या प्रशासक आहेत हे सिद्ध होते.**





नांदेड जिल्हा परिषदेच्या सीईओ मीनल करनवाल या संपन्न व्यक्तिमत्त्वाच्या आहेत. त्यांच्या अभिनव कार्यशैलीने त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. तत्पर सेवा देणारे प्रशासन ,महिला मुलांप्रतीची सजग जाणीव यातून आकाराला आणलेले कृती कार्यक्रम यामुळे त्या वेगळी वाट चोखाळणाऱ्या प्रशासक आहेत हे सिद्ध होते. नांदेड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या सीईओ म्हणून त्यांचे हे वेगळेपण प्रत्ययास येते.

भारतीय प्रशासन सेवा ही देशातील सर्वोच्च प्रशासकीय सेवा मानली जाते. विविध कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी त्यांच्याच मार्फत के ली जाते. या संपूर्ण व्यवस्थेला ते लीड करतात. होतकरू, हुशार असलेल्या विद्यार्थ्यांमधून जे अधिकारी तयार होतात त्यांची कामाप्रतीची जाणीव आणि तत्परता असते. नांदेड जिल्हा परिषदेच्या मीनल करणवाल या द्रष्ट्या, वेगळेपण मांडणाऱ्या अधिकारी आहेत.

नांदेड येथे रुजू झाल्यानंतर केलेल्या प्रशासकीय सुधारणा, प्रशासनातील गतिमानता महत्त्वाची राहिली आहे. कर्मचारी उपस्थितीसाठी ऑनलाइन उपस्थिती प्रणाली आणि फाईल ट्रेकिंगमुळे कामांना गती मिळाली आहे. या आधी त्यांच्या नंदुरबार येथील सेवा कालावधीत विविध पुरस्काराने त्यांना मानांकित करण्यात आले आहे.

मीनल करणवाल ह्या मूळच्या उत्तराखंडच्या. एकूण सामाजिक पार्श्वभूमी चांगली होती. त्या हुशार होत्या. त्यांच्यात विद्यार्थी दशेपासूनच चुणूक होती. प्रत्येक वर्षी वर्गात पहिला येण्याचा मान त्यांना मिळाला. त्यामुळे आपण अगदी आयएएस व्हायचं आहे हे स्वप्न त्यांनी मनाशी बाळगलं आणि ते पूर्णही केले. तसं प्रत्येकजणच स्वप्न पाहत असतो पण स्वप्नपूर्तीसाठी लागणारे परिश्रम आणि विशिष्ट ध्येय आणि प्रेरित होऊन करावा लागणारा अभ्यास, तग धरून राहण्याची, सातत्यपूर्ण अभ्यास आणि संघर्षाची वृत्ती अनेकांकडे नसते त्यामुळे निव्वळ स्वप्न पाहून स्वप्नांची पूर्ती होत नाही. परंतु त्यांनी ते स्वप्न पाहिले त्या दृष्टीने प्रयत्नांची पराकाष्ठा केली आणि ते स्वप्न पूर्ण झाले.त्यांच्या वडिलांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार दिला. त्यांचे वडील उत्तम नियोजक आहेत.अभ्यासाविषयी मार्गदर्शन केले .त्यांच्या वडिलांनी एकदा त्यांना कॉम्पिटिशन सक्सेस रिव्ह्यू हे मासिक दिलं आणि मीनल करणवाल यांनी ते पूर्ण वाचलं .तेव्हा खूप साऱ्या संधी प्रशासनात आहेत याची जाणीव झाली आणि मग प्रशासकीय सेवेतच जाण्याची त्यांनी निश्चित केले .इतिहास हा विषय घेऊन त्यांनी दिल्ली येथील स्टीफन्स कॉलेजमधून पदवी मिळवली. पदवीनंतर त्यांनी दिल्ली येथील क्लासेस जॉईन करून अभ्यासाला सुरुवात केली. सुरुवातीच्या दोन वर्षात त्यांच्यासाठी खडतर राहिली . २०१५, १६ या दोन वर्षी त्यांना अपेक्षित यश मिळू शकले नाही. दोन्ही वर्षी पूर्व परीक्षा साध्य करता आली नाही. या दरम्यान एक अनुभवी शिक्षक त्यांना भेटले त्यांनी त्यांना मेसेज केला तुम्ही आमच्या सोबत तयारी करा म्हणून सांगितलं आणि त्यांनी ४० मुलांची बॅच सुरू केली . या कामात त्यांनी उत्तम सहयोग दिला. याच वर्षी एप्रिल २०१७ मध्ये उत्तराखंडच्या अपूर्वा पांडे ह्या ३९ व्या क्रमांकाने संघ लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाल्या होत्या. अपूर्वा पांडे यांचा वर्तमानपत्रांमध्ये मोठा फोटो आला होता. त्या फोटोवर त्यांच्या चेहऱ्यावर मीनल करनवाल यांनी स्वतःचा चेहरा कट करून पेस्ट केला आणि आणि त्या फोटो खाली लिहिलं मीनल करणवाल ३३ रँक. तो फ़ोटो टेबलावर ठेवून त्यांची प्रेरणा घेऊन नंतर त्या जोमाने कामाला लागल्या आणि वयाच्या २४ व्या वर्षी देशात संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ३५ व्या क्रमांकाने मानांकित झाल्या. आयएएस मिळवलं. मसूरी येथे झालेल्या प्रशिक्षण सत्रात १८१ अधिकाऱ्यांमध्ये बेस्ट प्रोबेशनर म्हणून सुवर्णपदक त्यांना मिळाले. स्वप्न पाहिले. पराकाष्ठेचे प्रयत्न केले आणि यशस्वीही झाल्या.

आदिवासी भागात नंदुरबार येथे सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्पाधिकारी एकात्मिक आदिवासी प्रकल्प या पदावर काम करण्याची संधी मिळाली. या काळात त्यांनी शिक्षण आणि महिला बालकल्याण यावर विशेष लक्ष दिले .आदिवासी भागात बालकांच्या कुपोषणाचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे मुले लहानपणी दगावतात किंवा कुपोषणामुळे त्यांची व्यवस्थित वाढ होत नाही या बाबीवर लक्ष केंद्रित करून कूपोषण मुक्त नंदुरबार करण्यासाठी त्यांनी संकल्प केला. हेल्थ केअर वर्कर आणि महिला बालकल्याणाचे अंगणवाडी कार्यकर्ते यांचे विशेष प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षण सत्रात त्यांना एक कार्यकर्ता म्हणून तयार केले. या कार्यक्रमात अत्याधुनिकता आणि तंत्रज्ञानाचा वापर करत हेल्पलाइन द्वारा अनेकांना मदत देता आली. मुलं शिकत नाहीत. त्यांना आवश्यक क्रिया करता येत नाही. या बाबी निदर्शनास आल्या .यासाठी त्यांनी शिक्षणाचे नवे मॉडेल तयार केले. नवी प्रशिक्षण पद्धती आणली आणि त्याद्वारा सबंध आदिवासी शाळांमध्ये गतीने बदल झाला.

...आदिवासी पाड्यातील मुलं लिहू लागली, वाचू लागली. गणित करू लागली. बोलू लागली. व्यक्त होऊ लागली.एक नवा आयाम तयार झाला. मुलांची मानसिकता समजून घेऊन त्यांच्या बरोबरीने शिक्षकांना तयार केले. मुलांना अध्यापनाऐवजी अध्ययन करण्यावर भर दिला. त्यामुळे मुलांचा गुणात्मक विकास साधला. या संपूर्ण प्रणालीमध्ये त्यांनी स्वतः लक्ष घातले. वेळोवेळी बैठका, आढावा, कार्यक्रमांची आखणी कशाप्रकारे करायची याबाबतचे नियोजन त्यांनी स्वतः केले. त्यांचा हा प्रकल्प पथदर्शी राहिला.जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण मुलांना मिळावे ही त्यांची धारणा आहे. बऱ्याचदा ही धारणा कल्पनातीत वाटते .परंतु निश्चित आराखडे ,स्पष्ट संकल्पना आणि काम करण्याची वृत्ती असेल तर हे काम शक्य होते हे त्यांनी नंदुरबारमध्ये करून दाखवले आहे .हा प्रोजेक्ट त्यांनी नांदेडमध्ये राबविण्याचे निश्चित केले . शिक्षकांमध्ये क्रयशक्ती असते. नवे संबोध असतात. नव्या जाणीवा असतात .परंतु हे सगळे सर्जन करण्याचे काम अधिकाऱ्याला करावे लागते. ते मीनल करणवाल यांनी केले आहे.

मूल स्वतः शिकू शकते त्यासाठी फक्त शिक्षकांनी सुलभक म्हणून काम करायचं असतं. मूल जेव्हा स्वतः शिकू लागतं, अभिव्यक्त होऊ लागतं तेव्हा त्याच्यातील सर्जन विकसित होत असतं. या सर्जनशक्तीचा विकास झाला की मुलं बहूअंगांनी विकसित होतात.शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांनी चर्चा केली. मुलांच्या विकासाच्या दृष्टीने कशा पद्धतीने काम केले पाहिजे हे त्यांनी समजावून सांगितले. मुलांचे मानसशास्त्र समजून घेऊन मुलांना त्या पद्धतीने विकसित केलं तर मुलं भविष्यात जागतिक दर्जाचे होऊ शकतात. मुलांची निरीक्षण शक्ती, अभिव्यक्ती क्षमता ही प्रचंड असते. परंतु दैनंदिन अध्यापनाच्या प्रक्रियेमध्ये आपण मुलांच्या या सर्व क्षमता मारतो. परिणामी मुलाची घडवणूक नीट होत नाही. जे शिक्षक स्वतः काही नवीन देतात, शिकवतात, काही वेगळे प्रयोग करतात ती मुलं शिकू लागतात.

मुलांना सभोवार दाखवा. मुलांना आव्हाने द्या. मुले ती स्वीकारतात. कृती करतात. उत्तम कृतीला गौरवान्वित करा. हे जग प्रचंड स्पर्धेचे असल्यामुळे मुलांना स्पर्धेसाठी तयार करणे आवश्यक आहे. मुलांना निर्मिती क्षम, तसेच विश्लेषणक्षम बनवणे आवश्यक आहे. वाबळेवाडी मध्ये हे प्रयोग अतिशय सक्षमतेने झालेले आहेत. असेच प्रयोग नांदेड जिल्ह्यातील सक्षमपणे होतील यावर त्यांनी विश्वास व्यक्त केला आहे.मुलांना विकसित करण्यासाठी केवळ शाळा हेच माध्यम नाही तर पालकांनी व शिक्षकांनी विद्यार्थी विकासासाठी सातत्याने नवनवीन पायंडे धुंडायला हवेत. हिवाळी वर्ग, उन्हाळी वर्ग, खेळ, ट्रेकिंग, पुस्तक वाचनफ, वेगवेगळे छंद जोपासणे यातून व्यक्तिमत्त्वाचा विकास होत जातो अशी त्यांची धारण आहे .

लोकसहभागाच्या ऑपरेशन गगनभरारी सारख्या उपक्रमातून शाळांना आवश्यक असलेली भौतिक साधने ,इमारत दुरुस्ती, संरक्षक भिंती लोकसहभागातून मिळवणे, शाळा व्यवस्थापन समिती सक्रिय करणे त्यांचा सहभाग मिळविणे, सर्व शाळांमधील शाळा ग्रंथालय समृद्ध करण्यात येत आहेत.संपूर्ण शाळा ग्रंथालयाची चाचपणी आणि आवश्यक साधन सामग्रींची उपलब्धता याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत. बालिका पंचायत हा वेगळेपण दर्शविणारा कार्यक्रम त्यांनी सुरू केला आहे भविष्यात मुलींना अभिव्यक्त होण्यासाठी तिच्या आत्मविश्वास प्रगट होण्यासाठी उपक्रम निश्चितच लाभदायी ठरणार आहे. यामध्ये पारंपरिक ग्रामपंचायतीप्रमाणेच बालिका पंचायत असेल. गावातील ११ ते २१ वयोगटातील बालिकांची बालिका पंचायत निवडणूकीद्वारे निवडून अध्यक्ष सचिव म्हणून काम करतील आणि ग्रामपंचायत मधील घटनात्मक अधिकार आणि जबाबदारी समजून घेतील. यातून गाव विकासाचे नवे आयाम प्रस्थापित होण्यास मदत होणार आहे. बालविवाह प्रतिबंध स्वच्छता आरोग्य आणि शिक्षण याकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे. जिल्हा परिषद हे मिनी मंत्रालय असल्यामुळे अनेक जण आपले गाऱ्हाणी, प्रश्न घेऊन लोक जिल्हा परिषदेमध्ये येतात. त्यांचे प्रश्न वेळेवर निकाली लागावीत यासाठी टाईम बॉण्ड कार्यक्रम हाती घेण्यात आल आहे. दर सोमवारी याचा आढावा घेऊन प्रकरणी निकाली काढण्यात येतात.तसेच खाते प्रमुखांना तालुका संपर्क दौरे देऊन त्या तालुक्याचे अनेक प्रश्न मार्गी लावण्यात येतात. जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा ते गाव पातळीपर्यंत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या शासकीय सेवा संदर्भातील प्रश्न तात्काळ निकाली काढण्यात येतात.

माळेगाव यात्रा ही दक्षिण भारतातील मोठी यात्रा आहे. या यात्रेचे संपूर्ण नियोजन उत्कृष्ट पद्धतीने होईल यासाठी यावर्षी कसोशीने प्रयत्न करण्यात आले. संपूर्ण यात्रा प्लास्टिकमुक्त करून व्यावसायिकांची गैरसोय होणार नाही.यात्रेत सर्व सुविधा व्यवस्थितरित्या मिळतील अशा पद्धतीचे अतिशय काटेकोरबद्द नियोजन करण्यात आले. त्यामुळे यावर्षीची यात्रा ही वैशिष्ट्यपूर्ण ठरली.

यांच्या नियोजनबद्ध कार्यक्रमांचा आवाका खूप मोठा आहे. समाजाप्रती त्यांची तळमळ आहे. हाती घेतलेलं काम गाजावजा न करता ते पूर्ण कसे होईल हे पाहतात.व्यवस्था सुधार हा त्यांच्या उत्तम व्यवस्थापनातून हे दिसून येत आहे . नांदेड जिल्ह्यातील शिक्षण,महिला बालविकास व आरोग्य या क्षेत्रात आमुलाग्र बदलाचे कार्यक्रम घडून येत आहेत .एक सामाजिक आंदोलन उभे राहात आहे.ज्यांच्या हातून हे रचनात्मक काम होते आहे त्या जि.प.च्या सीईओ मीनल करनवाल यांना जन्मदिनाच्या अनंत शुभेच्छा.

**डॉ.विलास ढवळे**
सहायक कार्यक्रमाधिकारी, शिक्षण,
जिल्हा परिषद नांदेड.

२०१५–१६ या दोन वर्षी त्यांना अपेक्षित यश मिळू शकले नाही. दोन्ही वर्षी पूर्व परीक्षा साध्य करता आली नाही. या दरम्यान एक अनुभवी शिक्षक त्यांना भेटले त्यांनी त्यांना मेसेज केला तुम्ही आमच्या सोबत तयारी करा म्हणून सांगितलं आणि त्यांनी ४० मुलांची बॅच सुरू केली . या कामात त्यांनी उत्तम सहयोग दिला. याच वर्षी एप्रिल २०१७ मध्ये उत्तराखंडच्या अपूर्वा पांडे ह्या ३९ व्या क्रमांकाने संघ लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाल्या होत्या. अपूर्वा पांडे यांचा वर्तमानपत्रांमध्ये मोठा फोटो आला होता. त्या फोटोवर त्यांच्या चेहऱ्यावर मीनल करनवाल यांनी स्वतःचा चेहरा कट करून पेस्ट केला आणि आणि त्या फोटो खाली लिहिलं मीनल करणवाल ३३ रँक. तो फ़ोटो टेबलावर ठेवून त्यांची प्रेरणा घेऊन नंतर त्या जोमाने कामाला लागल्या आणि वयाच्या २४ व्या वर्षी देशात संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ३५ व्या क्रमांकाने मानांकित झाल्या. आयएएस मिळवलं.


